# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

०६ जानेवारी, २०२०


☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
✍: 7447744100 (PRO)


# स्थानिक गुन्हे शाखेची अवैध दारूतस्करांविरूध्द कार्यवाही
# १४ लक्ष ५५ हजाराचा दारूचा मुद्द्माल जप्त

दिनांक ०५/०१/२०१९ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जिल्हयात पोलीस स्टेशन वरोरा आणि पोलीस स्टेशन घुग्घुस हद्दीत गोपनीय माहितीवरून नाकेंबदी आणि छापा टाकुन दोन वाहनासह एकुण १४,५५,०००/—रू चा दारूचा मुद्द्माल जप्त केला आहे.

पोलीस स्टेशन वरोरा अंतर्गत वरोरा ते मोहबाडा रोडवरील वोल्टाससागर कॉलनीतील खुल्या जागेत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गोपनीय माहितीवरून छापा टाकला असता एक दुचाकी वाहन क्र. एमएच ३४बीएस ११२० वाहन मिळुन आले. सदर वाहनाजवळ आणि खुल्या जागेत एकुण ५९ बॉक्स देशी दारूचा माल किं. ५,९०,०००/—रू. मिळुन आला. सदरचा दारूचा माल आणि दुचाकी वाहन किं. ६५,०००/—रू असा एकुण ६,५५,०००/—रू चा मुद्द्माल जप्त करण्यात आला आहे. पुढिल तपास वरोरा पोलीस करीत आहे.

तसेच पोलीस स्टेशन घुग्घुस अंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेच्या दुसऱ्या पथकाने घुग्घुस येथील म्हातारदेवी रेल्वे गेटजवळ नाकेबंदी लावुन एक टाटासुमो वाहनास ताब्यात घेवुन वाहनाची झडती घेतली असता वाहनामध्ये १० प्लॉस्टीकच्या पिशव्यात ४००० नग दारूच्या बॉटल किं. ४,००,०००/—रू चा माल मिळुन आला. सदर दारूचा माल आणि दारू वाहतुकीकरीता वापरलेली वाहन टाटा सुमो क्र. एम एच १९ क्यु ७२५३ किं. ४,००,०००/—रू असा एकुण ८,००,०००/—रू चा मुद्द्माल जप्त करण्यात आला आहे. पुढिल तपास घुग्घुस पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही श्री. डॉ. महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात पोलीस निरिक्षक स्थागुशा श्री. ओ.जी. कोकाटे यांचे नेतृत्वात सफौ. पंडीत वऱ्हाटे, पोहवा. सुरेश केमेकर, धनंजय करकाडे, पोना. संजय आतकुलवार, पोशि. नितिन रायपुरे, गोपाल आतकुलवार, प्रितम रामटेके यांनी पार पाडली.

———————————————————————————————————————